# कै. आप्पांच्या आठवणी, विचार आणि कार्य



३१.०७.२०१५

मी वयाची उणीपुरी तेहतीस वर्ष आप्पांच्या सहवासात घालवली. सर्वतोपरी नि समग्रपणे त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला. क्वचित बरोबरीच्या नात्यानं वाद केला, अनेक प्रसंगी त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वापुढे नतमस्तक झालो. आज मागे वळून पाहताना आप्पांविषयी काय वाटतं? ....... अचंबा वाटतो. एका माणसाच्या जीवनाला इतके पैलू असू शकतात?

**आप्पांची बहुविध रूपं**

- 'आप्पा, कबड्डी खेळून दाखवा !' असा आग्रह लोक करत, एवढी गतिमान, आक्रमक कबड्डी आप्पा खेळत.
- आप्पांना केव्हातरी शोध लागला की आपल्याला गाता येतं. मग सुमधुर चाली विविध गीतांना देण्याचा छंद लागला.
- बासरी तर जीवनसखी. सुखदु:खाच्या प्रसंगी एकाकी क्षणांमधला विरंगुळा असलेली बासरी. तिच्यातून स्वरांच्या आर्त, उत्कट, प्रसन्न लहरी बाहेर पडत नि आसमंत भारून टाकत.
- संघाचे प्रचारक म्हणून झोकून देऊन केलेलं काम.
- सशस्त्र क्रांतीसाठी अनंत धोके पत्करून चालवलेली जुळवाजुळव.
- सिंहगडाच्या माथ्यावर बसून केलेलं राष्ट्रचिंतन, विवेकानंद चरित्र आणि अन्य अनेक पुस्तकांचं त्यानंतर केलेलं लेखन, तेवढच संघटनकुशल नि प्रेरक पत्रलेखन.
- सिंहगडाच्या पायथ्याच्या कल्याण गावापासून सुरुवात करून शिवगंगा व गुंजवणी खोऱ्यांतील १३७ गावांपर्यंत नेलेलं ग्रामविकसन कार्य.
- वाद्यबंदी मोडणं इत्यादींसारख्या राष्ट्र जागृती मंडळाच्या मोहिमा.
- राम – अशोकसारख्या मानस – पुत्रांचं पितृत्व करत असतानाच इतरही अनेक बुद्धिमान मुलांसाठी विशेष शिक्षणाचं चिंतन आणि प्रयोग.
- 'नेतृत्वशैली आणि नेतृत्वशिक्षण' या विषयात पीएच.डी., नेतृत्वविकसन प्रयोगांचं उपयुक्त आणि महत्त्वाचं काम.
- मानसशास्त्र, संस्कृत – संस्कृति, आयुर्वेद यांत नव्या संशोधनाच्या दिशा.
- वैद्यकशास्त्रातले प्रयोग आणि मन:शक्तीने व्याधीमुक्ती करण्याचे प्रयोग.
- नवे औदयोगिक संबंध – उद्योगनीती निर्माण करण्यासाठी, प्रबोधिनीला स्वावलंबी करण्यासाठी सुरु केलेले उद्योग व्यवसाय.
- कोयनेपासून आंध्रपर्यंतचं आपत्ती निवारण कार्य.
- केरळ, पंजाबमधल्या सामाजिक, राष्ट्रीय समस्यांवरचं काम.
- उपनयन, विवाहादी संस्कारांची कालोचित पुनर्ररचना.

- राष्ट्रीयत्व, अध्यात्म आणि विज्ञान यांसंबंधी मूलभूत मांडणी आणि सिद्धांत.
- आबालवृद्धांवर प्रेम करण्याची अपरंपार शक्ती.

.............. केवळ वरवर पाहिलं तरी मनाला चकित करणारी अशी ही व्यक्तिमत्वाची आणि कार्याची व्याप्ती आणि कार्याच्या दिशा आहेत. आप्पांच्या व्यक्तिमत्त्वाला असे बहुविध रंग होते, म्हणून त्यांचा अनेकानेक क्षेत्रांतील व्यक्तींशी सहज संवाद जुळे. संबंध दृढ होत. त्यांचा प्रबोधिनीच्या कार्याला लाभ होई. आप्पांचा लोकसंग्रहसुद्धा आश्चर्य वाटेल इतका मोठा. कल्याणपासून कॅनडापर्यंत सर्वदूर तो पसरलेला आहे.

(ज्ञान प्रबोधिनीचे द्वितीय संचालक वा.व.सी.तथा आण्णाजी ताम्हनकर यांनी मा. स्वर्णलता भिशीकर लिखित ‘ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक वि.वि. पेंडसे’ या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेतून)